26 AUG 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा पिढीने व्यवसायाची कास धरावी

## डॉ. जयदीप बागी : फार्मसी कॉलेजमध्ये उद्योजकता विकास कार्यशाळा



कोल्हापूर : भारती विद्यापीठाच्या फार्मसी कॉलेजमध्ये झालेल्या उद्योजकता विकास कार्यशाळेस उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया.

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय, उद्योगाकडे वळणे आवश्यक आहे. उद्योग, व्यवसायात नवनवीन कल्पना अंमलात आणून आपले करिअर घडवावे. आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग क्षेत्रात होणारे बदल लक्षात घेऊन अडचणींवर मात करून बाजारात आपला ब्रँड आणावा आणि यशस्वी उद्योजक म्हणून पुढे यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले.

जागतिक उद्योजकता दिनानिमित्त कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर उद्योजक-२०१७ कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. अनिलकुमार शिंदे व सचिन कुंभोजे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. जयदीप बागी अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया यांनी उद्योजकता विकास कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यशाळेत स्टार्टअप कनेक्ट प्रोग्रॅम आणि स्टार्ट अप फोरम असे दोन प्रोग्रॅम घेण्यात आले. स्टार्ट अप इंडिया, मुद्रा योजना आणि पेटंट, कॉपी राईट, ट्रेडमार्क याबद्दलची माहिती पुरवणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. विद्यापीठ कार्यशाळेतील विविध इंजिनीअरिंग, फार्मसी आणि मॅनेजमेंट कॉलेजमधील दोनशेपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. सांगली रिसर्च इक्युपमेंटचे प्रा. सचिन लोकापुरे यांनी इनोव्हेशन पेटंट आणि इंटरप्रिनरशिप या विषयावर मार्गदर्शन केले. बँक ऑफ इंडियाचे सल्लागार शहाजी शिंदे यांनी नवीन उद्योजकांच्या संकल्पना, संधी, स्टार्टअप या विषयावर मार्गदर्शन केले. अनुराग कोकितकर, एस. एस. कम्युनिकेशनचे सिद्धार्थ शहा, ग्रंथ बुक्सचे विशाल पिझानी, ऑरिज मेडिसीनचे डॉ. हेमंत भारती, सीमा बायोटेकचे विश्वास चव्हाण, आर्चर आप मोशन पिक्चर कंपनीचे पारितोष पाटील आदी उद्योजकांनी मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. अनिलकुमार शिंदे, डॉ. सचिन पिशवीकर, ओपेक्स ट्रेनिंगचे सचिन कुंभोजे, अंजोरी परांडेकर आदींचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 AUG 2017

लोकमत

# विद्यापीठ अधिसभेसाठी ऑक्टोबरमध्ये मतदान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठीची प्रक्रिया सध्या सुरु आहे. याअंतर्गत अधिसभेवर प्राध्यापक आणि पदवीधर मतदार गटातील निवडून जाणाऱ्या जागांसाठी ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात मतदान होण्याची शक्यता आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठातील अधिसभा या अधिकार मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाली आहे. अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरमधून १० प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असतात. विद्यापीठाने पदवीधर नोंदणीची प्रक्रिया दि. ५ जूनला सुरु केली. यासाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत गेल्या महिन्यात संपली आहे. या अंतर्गत १४ हजार अर्ज पात्र ठरले आहेत.